• वर्ष : ०४ • अंक : ००८ • पुणे • गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




# ‘आरंभपर्व’चा चौथा वर्धापन दिन उत्साहात

**• ‘आरंभपर्व’ने सर्वसामान्यांना दिले हक्काचे व्यासपीठ • पत्रकार भवन उभारणीसाठी सहकार्य करण्याचे आमदार भीमराव तापकीर यांचे आश्वासन**

**प्रमुख उपस्थिती** आमदार भीमराव तापकीर | नगरसेवक तथा गटनेते काकासाहेब चव्हाण | नगरसेवक श्रीकांत जगताप | सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई | पत्रकार मिलिंद पानसरे | संपादिका सुरेखा मते | नितीन वाघ | नगरसेवक दत्ताभाऊ कोल्हे | यशवंत लायगुडे | सारंग नवले | निवासी संपादक लक्ष्मण साबळे | व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे | मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com









## ‘आरंभपर्व’ने नागरिकांना व्यासपीठ दिले
## आमदार भीमराव आण्णा तापकीर



नागरिकांच्या प्रश्नांना आणि स्थानिक विषयांना व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम दैनिक आरंभपर्वने केले आहे. गेल्या चार वर्षांपासून खडकवासला मतदारसंघात या वृत्तपत्राची स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून, आगामी काळातही हे काम अधिक व्यापक व्हावे, अशा शुभेच्छा आमदार तापकीर यांनी दिल्या. स्थानिक नागरिकांच्या समस्या, परिसरातील विकासकामे, सामाजिक उपक्रम आणि विविध प्रश्न सातत्याने माध्यमातून पुढे आणणे ही लोकशाहीतील महत्त्वाची भूमिका आहे. आरंभपर्वने गेल्या चार वर्षांत ही भूमिका बजावल्याचेही तापकीर यांनी सांगितले.

## ‘आरंभपर्व’कडून स्थानिक विषयांना विशेष व्यासपीठ : श्री. काकासाहेब चव्हाण

पुणे शहर, खडकवासला, सिंहगड परिसर तसेच उपनगरांमधील स्थानिक प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याचे काम दैनिक ‘आरंभपर्व’च्या माध्यमातून केले जात आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विषयांना प्राधान्य देत त्यांच्या समस्या प्रशासन आणि संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविण्यासाठी ‘आरंभपर्व’ने विशेष व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे काकासाहेब चव्हाण यांनी सांगितले. दैनिक ‘आरंभपर्व’च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी ‘आरंभपर्व’च्या चार वर्षांच्या वाटचालीचे कौतुक करत संपादक, पत्रकार आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. काका चव्हाण म्हणाले, “पुणे शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना शहराच्या विविध भागांमध्ये अनेक नवे प्रश्न निर्माण होत आहेत. रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा, नागरी नियोजन यांसह नागरिकांच्या रोजच्या जीवनाशी संबंधित अनेक प्रश्न असतात. या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळणे आणि ते प्रशासनापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. दैनिक ‘आरंभपर्व’ने स्थानिक विषयांना महत्त्व देत ही भूमिका प्रभावीपणे पार पाडली आहे.” “विशेषतः पुणे शहर आणि सिंहगड परिसरातील अनेक स्थानिक प्रश्नांना ‘आरंभपर्व’मधून प्रसिद्धी मिळते. नागरिकांच्या समस्या, स्थानिक पातळीवरील घडामोडी आणि सामाजिक उपक्रम यांना स्थान देत या वृत्तपत्राने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. स्थानिक प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकल्यामुळे नागरिकांमध्येही या वृत्तपत्राबद्दल आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे,” असे त्यांनी नमूद केले. गेल्या चार वर्षांच्या काळात ‘आरंभपर्व’ने केलेली वाटचाल उल्लेखनीय असल्याचे सांगत चव्हाण यांनी पुढे म्हटले की, “वृत्तपत्राचा प्रवास हा केवळ चार वर्षांचा कालावधी नसून त्यामागे असलेली मेहनत, संघर्ष, सातत्य आणि वाचकांचा विश्वास यांचे हे फलित आहे. कोणत्याही माध्यम संस्थेसाठी वाचकांचा विश्वास ही सर्वांत मोठी ताकद असते. ‘आरंभपर्व’ने हा विश्वास निर्माण केला असून आगामी काळात तो अधिक दृढ करण्यासाठी टीमने प्रयत्नशील राहावे.”

## ‘आरंभपर्व’ घरातील वृत्तपत्र : तृप्तीताई देसाई

दैनिक ‘आरंभपर्व’ हे केवळ बातम्या देणारे वृत्तपत्र न राहता सर्वसामान्यांच्या सुख-दुःखाशी, त्यांच्या प्रश्नांशी आणि दैनंदिन जीवनाशी जोडले गेले आहे. त्यामुळे ‘आरंभपर्व’ वाचताना ते आपल्या घरातीलच वृत्तपत्र असल्याची भावना निर्माण होते, असे सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई यांनी सांगितले. दैनिक ‘आरंभपर्व’च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी ‘आरंभपर्व’च्या आजवरच्या वाटचालीचे कौतुक करत वृत्तपत्राच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. तृप्ती देसाई म्हणाल्या, “एखादे वृत्तपत्र सुरू करणे आणि ते सातत्याने चालवणे ही सोपी गोष्ट नाही. शून्यातून सुरुवात करून आज ‘आरंभपर्व’ने निर्माण केलेले स्थान ही त्यामागील टीमच्या मेहनतीची, चिकाटीची आणि पत्रकारितेवरील विश्वासाची पावती आहे. अल्पावधीत या वृत्तपत्राने सर्वसामान्य वाचकांशी आपले नाते निर्माण केले आहे. त्यामुळे ‘आरंभपर्व’ हातात घेतल्यानंतर ते बाहेरचे वृत्तपत्र न वाटता आपल्या घरातीलच एक सदस्य असल्यासारखे वाटते.” “समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज प्रशासन आणि संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे ही माध्यमांची महत्त्वाची जबाबदारी आहे. ‘आरंभपर्व’ ही जबाबदारी सातत्याने पार पाडताना दिसते. विशेषतः तळागाळातील नागरिकांच्या समस्या, परिसरातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, वाहतूक, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य तसेच सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांना वृत्तपत्रातून प्रसिद्धी मिळते. एखाद्या सामान्य नागरिकाचा प्रश्न वृत्तपत्राच्या माध्यमातून मांडला जातो आणि त्याची दखल घेतली जाते, तेव्हा पत्रकारितेचे खरे सामाजिक महत्त्व अधोरेखित होते,” असेही त्यांनी नमूद केले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर, खडकवासला आणि सिंहगड रोड परिसरातील नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणारे आणि गेल्या चार वर्षांत वाचकांच्या पसंतीस उतरलेले दैनिक आरंभपर्व पुणे यांचा चौथा वर्धापन दिन सोहळा धायरी फाटा येथील सिल्वर पेटल्स हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात सिंहगड, खडकवासला आणि परिसरातील पत्रकारांसाठी सुसज्ज पत्रकार भवन उभारण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करू, असे आश्वासन आमदार भीमराव तापकीर यांनी दिले. सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी पत्रकार भवनाची मागणी मांडल्यानंतर आमदार तापकीर यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेत सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यामुळे वर्धापन दिन सोहळ्यात पत्रकार भवनाचा मुद्दा विशेष चर्चेचा ठरला.

आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यास राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. दैनिक आरंभपर्वच्या चार वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. ‘आरंभ एका नव्या पर्वाचा’ हे ब्रीद घेऊन सुरू झालेल्या या दैनिकाने अल्पावधीतच स्थानिक प्रश्न, सामाजिक विषय, राजकीय घडामोडी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणींना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे मान्यवरांनी सांगितले.



### पत्रकार भवनासाठी सहकार्य करा; मिलिंद पानसरे यांची मागणी

यावेळी बोलताना सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी दैनिक आरंभपर्वच्या चार वर्षांच्या कार्याचे कौतुक केले. सिंहगड, खडकवासला आणि परिसरातील पत्रकारांसाठी सुसज्ज पत्रकार भवनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारांसाठी बैठका, पत्रकार परिषदा, सामाजिक उपक्रम तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी पत्रकार भवन उभारणे गरजेचे आहे. पत्रकारिता क्षेत्रातील बांधवांना एकत्रित आणण्यासाठी आणि पत्रकारांच्या विविध उपक्रमांना चालना देण्यासाठी हे भवन महत्त्वाचे ठरेल. त्यामुळे पत्रकार भवनाच्या उभारणीसाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, अशी मागणी पानसरे यांनी आमदार भीमराव तापकीर यांच्याकडे केली.

### पत्रकार भवन उभारण्यासाठी निश्चित प्रयत्न करू : भीमराव तापकीर

मिलिंद पानसरे यांनी केलेल्या पत्रकार भवनाच्या मागणीची आमदार भीमराव तापकीर यांनी गांभीर्याने दखल घेतली. खडकवासला मतदारसंघातील पत्रकारांसाठी हक्काचे आणि उपयुक्त व्यासपीठ असणे आवश्यक असून, पत्रकार भवन उभारण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या चार वर्षांपासून खडकवासला मतदारसंघातील नागरिकांच्या प्रश्नांना दैनिक आरंभपर्वने व्यासपीठ दिले आहे. स्थानिक प्रश्न प्रशासन आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविण्याचे काम माध्यमे करीत असतात. त्यामुळे पत्रकारांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी सहकार्य करणे ही आपली जबाबदारी असल्याचेही तापकीर यांनी नमूद केले. पत्रकार भवनाच्या मागणीला लोकप्रतिनिधींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने उपस्थित पत्रकारांनीही या घोषणेचे स्वागत केले. परिसरातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज जागा उपलब्ध झाल्यास पत्रकार परिषद, बैठका, चर्चासत्रे, सामाजिक उपक्रम तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर एकत्रितपणे काम करण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. **(पुढील पानावर)**



# चार वर्षांत वाचकांचा विश्वास संपादन



## पत्रकार भवनाच्या आश्वासनाकडे सर्वांचे लक्ष

वर्धापन दिन सोहळ्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला तो म्हणजे सिंहगड-खडकवासला परिसरातील पत्रकारांसाठी पत्रकार भवन उभारण्याचा विषय. पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी मांडलेल्या मागणीवर आमदार भीमराव तापकीर यांनी सकारात्मक भूमिका घेत पत्रकार भवन उभारण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आगामी काळात या मागणीच्या पूर्ततेसाठी कोणती पावले उचलली जातात, याकडे पत्रकारिता क्षेत्राचे लक्ष लागले आहे.





**(दै. आरंभ पर्व)**

गेल्या चार वर्षांच्या वाटचालीत दैनिक आरंभपर्वने पुणे शहर, खडकवासला आणि सिंहगड रोड परिसरातील नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने प्रसिद्धी दिली. स्थानिक पातळीवरील विविध प्रश्न प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविण्याचे काम वृत्तपत्राच्या माध्यमातून करण्यात आले. त्यामुळे या परिसरातील वाचक आणि नागरिकांशी आरंभपर्वचे नाते अधिक दृढ झाले असल्याचे यावेळी विविध मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

**आकस न ठेवता केलेली पत्रकारिता कौतुकास्पद : नितीन वाघ**

शिवसेनेचे नितीन वाघ यांनीही आरंभपर्वच्या वाटचालीचे कौतुक केले. अत्यंत कमी कालावधीत प्रत्येक घटकाला आपलेसे करण्याचा प्रयत्न आरंभपर्वने केला आहे. कोणाविषयीही आकस न ठेवता आणि नम्रतेने केलेली पत्रकारिता निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

कोणताही विषय दिला तरी त्याला दाद देण्याचे काम

निलेश दमिस्टे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून दैनिक आरंभपर्वची झेप आपण पाहत असल्याचे सांगितले. कोणताही विषय मांडला तरी त्या विषयाला योग्य प्रकारे दाद देण्याचे आणि त्याला प्रसिद्धी देण्याचे काम आरंभपर्वने केले आहे, असे त्यांनी नमूद केले.

**सर्व क्षेत्रातील कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम : सनी रायकर**

सनी रायकर यांनी या भागातील विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम दैनिक आरंभपर्व करत असल्याचे सांगितले. सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना आपले कार्य जनतेसमोर मांडण्यासाठी आरंभपर्वने हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी नमूद केले.

**मान्यवरांची मोठी उपस्थिती** : या वर्धापन दिन सोहळ्यास आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक श्रीकांत जगताप, काकासाहेब चव्हाण, भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, दैनिक आरंभपर्वच्या संपादिका सुरेखा मते, सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, भाजप मंडळ अध्यक्ष यशवंत लायगुडे, भाजप प्रदेश ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे, भाजप नेते सारंग नवले, प्रशांत मते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, वाचक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकारिता क्षेत्रातून सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, लोकमतचे कल्याण आवताडे, सकाळचे निलेश चांदगुडे, सकाळच्या जागृती कुलकर्णी, तरुण भारतचे जयंत जाधव, सी 24 तासचे अमोल उदमले, महाराष्ट्र दर्पणचे ज्ञानेश्वर जाधव, रक्षक जनतेचा चे राजकुमार बनसोडे, मीडिया वर्ल्डचे सुमित आंबेकर, न्यूज इंडियाचे प्रकाश यादव, नागरिकशस्त्र न्यूजचे ज्ञानेश्वर दळवी, डिजिटल पुणेचे गजानन मेनकुदळे, उचित मीडिया सर्विसेसचे जीवराज चोले, अमोल हांडे, पूर्वा हांडे, नीलम कुलकर्णी, वंदना कोर्टिकर, मंजुषा आवळकंठे, दीपाली ढमाले आदी पत्रकार व माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते.

सामाजिक क्षेत्रातून श्रुफिन फाउंडेशनच्या सविता रासोटे, विजय रासोटे, व्यसनमुक्ती केंद्राचे सुभाष हगवणे, विसावा फाउंडेशनच्या स्वाती पवार, निलेश दमीष्टे, सनी रायकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जनार्दन भोसले तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती. राजकीय क्षेत्रातून आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, श्रीकांत जगताप, माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, भाजप नेते सारंग नवले, भाजप प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील परखड, नंदकुमार जगताप, तुषार पोकळे, शहाजी वांजळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**पाचव्या वर्षात अधिक ताकदीने वाटचाल करण्याचा संकल्प**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक राज शिनारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी संपादक लक्ष्मण साबळे यांनी केले. यावेळी त्यांनी दैनिक आरंभपर्वच्या चार वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला.

चार वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर पाचव्या वर्षात पदार्पण करताना वाचकांचा विश्वास अधिक दृढ करणे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे आवाज देणे आणि समाजातील प्रत्येक घटकाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

दैनिक आरंभ पर्वने आतापर्यंतच्या वाटचालीत मिळविलेला वाचकांचा विश्वास पुढेही कायम ठेवत स्थानिक प्रश्नांना अधिक व्यापक स्वरूपात प्रसिद्धी देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**वाचक, हितचिंतकांचे नाते अधिक दृढ करण्याचे आवाहन**

व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे यांनी आभार व्यक्त केले. दैनिक आरंभपर्वशी वाचकांचे, हितचिंतकांचे आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचे नाते असेच फुलत राहावे, असे आवाहन त्यांनी केले. आगामी काळातही जनतेच्या प्रश्नांसाठी आरंभपर्व निश्चितपणे व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे यांनी केले. चार वर्षांचा प्रवास पूर्ण करून पाचव्या वर्षात प्रवेश करत असताना आरंभपर्वच्या संपूर्ण टीमने वाचक, हितचिंतक आणि समाजातील विविध घटकांच्या सहकार्याने पुढील वाटचाल अधिक जोमाने करण्याचा संकल्प केला.




















# राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक द. मा. पिंगळेंचा कृतज्ञतापूर्वक सेवापूर्ती प्रवास

(दै. आरंभ पर्व)

***"गुरु हा केवळ ज्ञानदाता नसतो, तर तो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ असतो." या दिपस्तंभाचे व्रत म्हणजे, शिक्षकी पेशा हा केवळ एक व्यवसाय नाही, तर ती एक साधना आहे. असे मानणारे व्रतस्थ जीवनतीर्थ .! त्यांनाच समाजाने गुरुस्थान देऊन 'तस्मै श्री गुरवे नमः' असे म्हणत गुरुजी हे नामनिधान दिलं ..!***

*विद्यार्थ्यांच्या अज्ञानाचा अंधार दूर करून त्यांच्या आयुष्याला संस्कारांची आणि ज्ञानाची जोड देणारे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक द. मा. पिंगळे गुरुजी. आपल्या प्रदीर्घ, निष्कलंक आणि अत्यंत प्रेरणादायी सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. हा क्षण जितका त्यांच्या वैयक्तिक आयुष्यासाठी आनंदाचा आहे, तितकाच तो संपूर्ण शिक्षण क्षेत्रासाठी आणि जिल्हा परिषद शाळेसाठी भावुक करणारा आहे.कर्तृत्व आणि समर्पणाचा सुवर्णप्रवास*

द. मा. पिंगळे संपूर्ण

**• श्री. किरण खुडे •**

सेवाकाळ हा ज्ञानदानाच्या पवित्र यज्ञासारखा राहिला आहे. दुर्गम भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्यापासून ते तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन सोपे करण्यापर्यंत त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, याकडे त्यांनी नेहमीच कटाक्ष ठेवला. त्यांच्या याच अविरत परिश्रमांची, नाविन्यपूर्ण प्रयोगांची आणि शैक्षणिक गुणवत्तेची दखल घेऊन भारत सरकारच्या वतीने सन २००७-०८ मध्ये राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने त्यांचा गौरव झाला. तत्कालीन राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते दिल्ली येथे हा सन्मान प्राप्त झाला. तो सन्मान केवळ त्यांचा नव्हता, तर त्यांनी घडवलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा आणि संपूर्ण शिक्षक वर्गाचा तो अभिमानाचा क्षण होता.

एक आदर्श शिक्षक कसा असावा, याचे चालतेबोलते उदाहरण म्हणजे पिंगळे गुरुजी. त्यांचा शांत स्वभाव, चेहऱ्यावरील प्रसन्न हसू, विद्यार्थ्यांबद्दलची आपुलकी आणि सहकाऱ्यांना नेहमी मदत करण्याची वृत्ती यामुळे त्यांनी प्रत्येकाच्या हृदयात एक हक्काचे स्थान निर्माण केले.

## ज्ञानरूपी प्रकाशाचा दीपस्तंभ



वर्गातील सर्वात मागे बसणाऱ्या आणि अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यालाही प्रेमाने जवळ करून त्याला यशाच्या शिखरावर पोहोचवण्याचे अद्भुत कौशल्य त्यांच्याकडे होते. हे त्यांच्या शैक्षणीक प्रवासातील मोठे कौशल्य आहे.

खेड तालुक्यातील गुळाणी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात आई छलाबाई आणि वडील मारुती पिंगळे यांच्या उदरी जन्मलेले व गुळाणी येथेच प्राथमिक शिक्षण घेऊन, पुढे माध्यमिक शिक्षण वाफगांव येथे रयत शिक्षण संस्थेच्या म. य. होळकर विद्यालयात घेतलेल्या पिंगळे गुरुजींनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना आदर्श मानत स्वावलंबी शिक्षण घेतले. पुण्यात डी.एड. आणि बी. एड. चे शिक्षण पुर्ण केले. पुढे ४ जानेवारी १९८८ रोजी कोरेगाव बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर केवळ पोटापाण्यासाठी नोकरी न करता विद्यार्थी घडविण्याकडे त्यांनी जास्त लक्ष दिले. त्यांची दूरदृष्टी, नवनवे प्रयोग करून यश मिळविण्याची इच्छाशक्ती, वेगवेगळ्या कल्पना अमलात आणणे, शिक्षणाची वेगवेगळी क्षेत्रे निवडणे व धडपड या पंचसूत्रीनुसार पिंगळे सरांनी आपला शिक्षकी प्रवास सुकर केला. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची आर्थिक, कौटुंबिक परिस्थिती समजून घेऊन त्यांना आर्थिक पाठबळाबरोबरच विद्यार्थ्यांची हुशारी, कौशल्य पाहून त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या जीवनात दिशा देण्याचे मोलाचे कार्य केले. मुलांबरोबर केवळ अभ्यासातच नव्हे तर त्यांच्या इतर गुणांमध्ये रमताना त्यांच्याशी समरस होऊन जवळीक साधून मुलांच्या कलाने त्यांना घडविण्यासाठी सरांनी नेहमीच प्रयत्न केले. बराच काळ त्यांनी टाकळकरवाडी केंद्रप्रमुख म्हणून आदर्श काम केले. तर शिक्षक सहकाऱ्यांच्या आग्रहाखातर खेड तालुका शिक्षक पतसंस्थेचे सभापती म्हणूनही कामाची जबाबदारी सांभाळली.

शाळेतील कोणताही कार्यक्रम असो त्याचे नियोजन करणे यात त्यांचा हातखंडा. आपल्या कल्पक बुद्धीने सर्व कार्यक्रमाचे योग्य नियोजन करून सुसूत्रता आणत कार्यक्रम यशस्वी करणे यात सरांचा हात कोणीही धरू शकत नव्हता. स्नेहसंमेलन असो वा शाळेतील कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम सरांचा उत्साह नेहमीच ओसंडून वाहत असायचा आणि मग कार्यक्रमाच्या यशस्वीतेत तो दिसून यायचा. केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर विशाल, बाहेरील जगाचे ज्ञान देणारे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना सामाजिक, व्यवहारिक ज्ञान ज्ञात करून देण्याकडे त्यांचा जास्त कल असायचा. शालेय शिक्षणासह स्काऊट गाईड, लेझीम पथक, संचलन, मानवंदना यासाठी शिक्षक म्हणून कार्य करताना अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. शेकडो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परिक्षेत यश मिळवून देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. यातूनच त्यांची विद्यार्थ्यांकडे पाहण्याची आणि शिक्षक म्हणून समाजाचे ऋण व्यक्त करण्याची सामाजिक वृत्ती दिसून येते. कोरेगाव बुद्रुक, टाकळकरवाडी, ढोरेभांबुरवाडी, चास, राजगुरुनगर, गोदरे आदी शाळांचा कायापालट करणे, ग्रंथालय समृद्ध करणे, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे अशा प्रत्येक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. ते सेवानिवृत्त होत असले, तरी त्यांनी लावलेले ज्ञानाचे हे रोपटे आता एक विशाल वटवृक्ष बनले आहे. त्यांनी घडवलेले शेकडो विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर, विविध क्षेत्रात कार्यरत राहून त्यांच्या संस्कारांची पताका फडकवत आहेत.

त्यांच्या या जीवनप्रवासात त्यांना आई-वडिलांचे संस्कार, पत्नी सौ. रोहिणी पिंगळे — आदर्श आरोग्य सेविका, मुलगी सुप्रिया, मुलगा अक्षय, सून मृणाल, जावई सिद्धेश तसेच नातेवाईक, सगे-सोयरे आणि आप्तेष्ट यांच्या प्रेमाची व सहकार्याची शिदोरी सदैव सोबत राहिली.

शाळेचा परिसर, फळा, खडू आणि विद्यार्थ्यांचा गलबला या साऱ्या प्रवासाला त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर पूर्णविराम मिळत असला, तरी त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात कोरलेली अक्षरे आणि विचार कधीही पुसले जाणार नाहीत. खडतर प्रवासातही हसतमुखाने ज्ञानदान करण्याचे त्यांचे कसब आणि प्रत्येक विद्यार्थ्याला आपलेसे करण्याची त्यांची वृत्ती नेहमीच प्रेरणादायी राहील.

## हिरो मोटोकॉर्पकडून भारताच्या कला प्रकारांचा गौरव करत फेस्टिव्ह २०२६ चा शुभारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** हिरो मोटोकॉर्प या जगातील मोटरसायकल आणि स्कूटर्सच्या सर्वात मोठ्या उत्पादक कंपनीने आज आपल्या फेस्टिव्ह मोहिमेचे अनावरण केले. या मोहिमेद्वारे वारली (महाराष्ट्र), कलमकारी (आंध्र प्रदेश/तेलंगणा), गोंड (मध्य प्रदेश), पिछवाई (राजस्थान) आणि माता नी पछेडी (गुजरात) या भारतीय कला प्रकारांच्या माध्यमातून श्री गणेशाच्या आगमनाचा उत्सव साजरा करण्यात येत आहे. भारताच्या विविध भागांतील कारागिरांना एकाच मंचावर आणून ही मोहीम देशाच्या समृद्ध लोककलेच्या वारशाला फेस्टिव्हच्या संवादाच्या केंद्रस्थानी ठेवते, तसेच हिरो डेस्टिनीच्या माध्यमातून समकालीन संवेदी अभिव्यक्ती (सेन्सरी एक्स्प्रेशन) सादर करते. ही मोहीम १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ दरम्यान संपूर्ण गणेशोत्सव काळात सुरू राहील. ही मोहीम विविध कला परंपरा आणि निपुण कलाकारांना एकत्र आणून बाप्पाच्या स्वागतासाठी प्रत्येक प्रदेशाच्या सांस्कृतिक ओळखीचे अनोख्या दृश्य रुपात रूपांतर करते.

## जेसीबी इंडियाची १० नवीन मेड-इन-इंडिया उत्पादने सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** जेसीबी इंडिया या अर्थमूव्हिंग आणि बांधकाम उपकरणांच्या आघाडीच्या उत्पादक कंपनीने बाऊमा कोनेक्सपो इंडिया २०२६ मध्ये १० नवीन उत्पादने सादर केली. ही नवीन श्रेणी भारतात डिझाइन, इंजिनिअर आणि उत्पादित केलेली असून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील ग्राहकांच्या बदलत्या गरजांची पूर्तता करते. बाऊमा कोनेक्सपो इंडिया २०२६ मध्ये जेसीबी इंडियाने आपल्या पोर्टफोलिओमधील २१ उत्पादने प्रदर्शित केली, ज्यामध्ये कंपनीच्या आयकॉनिक बॅकहो लोडर्सच्या नवीन श्रेणीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. उत्पादकता, इंधन कार्यक्षमता आणि ऑपरेटर अनुभवावर लक्ष केंद्रित करून प्रगत करण्यात आलेले नवीन ३डीएक्स, ३डीएक्स प्लस आणि ३डीएक्स सुपर लाँच करण्यात आले. या पोर्टफोलिओमध्ये भारतातील कामाच्या परिस्थितीच्या सखोल आकलनासह जागतिक अभियांत्रिकी आणि नाविन्यतेच्या मानकांची सांगड घालण्यात आली आहे. हे पाऊल आत्मनिर्भर भारतामध्ये योगदान देण्याच्या आणि भारताला जागतिक उत्पादन व निर्यात केंद्र म्हणून मजबूत करण्याच्या कंपनीच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.


## ग्रामपंचायत मांजरेवाडी, ता. खेड, जि. पुणे

बी-१, निविदा अंतर्गत निविदा सुचना, सन-२०२६/२७

ग्रामपंचायत मांजरेवाडी, ता.खेड, जि.पुणे यांचे तर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग व जि.प. पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं. मांजरेवाडी, ता.खेड, जि.पुणे यांचेकडून दि. १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स. १० : ३० ते ०५ : ०० वाजेपर्यंत देण्यात येतील व भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६ रोजी सायं. ०४ : ०० वाजेपर्यंत ग्रा.प. मांजरेवाडी, ता.खेड, जि. पुणे मध्ये स्वीकारण्यात येतील. व शक्य झाल्यास दि. २४/०९/२०२६ सायंकाळी ०५ : ०० वा. उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | कोऱ्या निविदेची किंमत रक्कम रूपये | काम पूर्ण करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मांजरेवाडी पिंपळ बाबाजी मांजरे घर ते सुर्यकांत मांजरे घरापर्यंत बंदिस्त गटार करणे. | २९९२७२/- | २३६/- | ३ महिने |
| २. | मांजरेवाडी दशक्रिया घाट पाणी पुरवठा योजना करणे. | २९९६३१/- | २३६/- | ३ महिने |
| ३. | मांजरेवाडी पिंपळ, धर्म बंदिस्त गटार व चेंबर दुरुस्ती करणे. | ३८०५७७/- | २३६/- | ३ महिने |
| ४. | मांजरेवाडी पिंपळ, धर्म पाणी पुरवठा योजना करणे. | २४७०४१/- | २३६/- | ३ महिने |
| ५. | मांजरेवाडी सांडपाणी व्यवस्थापन करणे. | ५५६६४०/- | २३६/- | ३ महिने |

अटी व शर्ती : १) सदर निविदा पोस्टाने अथवा स्वतः समक्ष ग्रा.प. मांजरेवाडी कार्यालयात कार्यालयीन वेळेत सकाळी १०:०० ते ०५:०० (सुट्टीचे दिवस वगळून) स्विकारल्या जातील. २) कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा, बदल करण्याचे सर्व अधिकार सरपंच ग्रा.प. मांजरेवाडी यासं राहतील. ३) सदर निविदा लगतच्या मासिक सभेत उघडण्यात येतील. ४)सदर कामाचे मोजमाप पुस्तक व मुल्यांकन दाखला मिळाल्यानंतर रक्कम अदा करण्यात येईल. ५) सदरचे काम उपअभियंता व शाखा अभियंता, बांधकाम विभाग, प. स. खेड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात यावे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत मांजरेवाडी, ता. खेड, जि. पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत मांजरेवाडी, ता. खेड, जि. पुणे**



## वाहन हस्तांतर नोटीस

तमाम लोकांना या नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, माझे पती कै. सुजीत किसन टाव्हरे यांचे दि. १९/०८/२०२६ रोजी निधन झाले आहे. माझ्या पतीच्या नावे आरटीओ पिंपरी चिंचवड येथे नोंद असलेली मोटार कार आहे. त्याचा तपशील - MARUTI SUZUKI INDIA LTD, Motor car, RIGID (PASENGAR CAR) चारचाकी गाडी नंबर MH-14, HQ -1032 असून त्यांचे पश्चात त्यांची कायदेशीर वारस म्हणून मी त्यांची पत्नी पूनम सुजीत टाव्हरे. रा. प्लॅट नं. ४०१, ए जिना, पडाळकरवाडी रोड, येसाई पार्क, सिद्धीविनायक देव, राजगुरुनगर, ता. खेड, जि.पुणे. महाराष्ट्र, पीन- ४१०५०५. या नावे सदरील वाहन हस्तांतरित करीत आहे. याबाबत आरटीओ, पिंपरी चिंचवड येथे अर्ज केलेला आहे. याबाबत कोणाची काही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत हरकत घ्यावी, त्यानंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

**अर्जदार सही/-**
**पूनम सुजीत टाव्हरे.**
**मोबा. - 9850159416**



## ग्रामपंचायत वाळुंजवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे

बी-१ खुली निविदा सुचना

ग्रामपंचायत वाळुंजवाडी ता. आंबेगाव, जि. पुणे यांचे तर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग व जि.प. पुणे यांचेकडील नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार सर्वसाधारण (खुला) वर्ग १ ते ७ पर्यंत, पुणे जि.प. नोंदणीकृत मजूर संस्था यांजकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं. कार्यालय वाळुंजवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे यांचेकडून दि. १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स. १० : ३० ते ०५ : ०० वाजेपर्यंत देण्यात येतील व भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६ रोजी सायं. ०५ : ०० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालय वाळुंजवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे मध्ये स्वीकारण्यात येतील. व शक्य झाल्यास दि. २४/०९/२०२६ संध्याकाळी ०५ : १० वा. उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | इसारा रक्कम | कालावधी | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वाळुंजवाडी येथील सावर्जनिक विहीरीस तार कंपाऊंड करणे. (ता. आंबेगाव) | १,१८,७२५/- | १५वा वित्त आयोग | १% | ३ महिने | १००/- |

टीप : १) कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा/ काम रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी सादर करणे आवश्यक आहे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत वाळुंजवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत वाळुंजवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे**


## एसयूव्हीच्या नावाची घोषणा

**गुरुग्राम (दै. आरंभ पर्व)** ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडने (एचएमआयएल) आज आपली बहुप्रतिक्षित आगामी इंटेलिजंट एसयूव्हीए ह्युंदाई बेयॉनच्या नावाची घोषणा केली. ह्युंदाईची नवीन जागतिक एसयूव्ही बेयॉन भारतातील ह्युंदाईसाठी उत्साहवर्धक नवीन अध्यायाची सुरुवात आहे. एचएमआयएलच्या एसयूव्ही श्रेणीतील नवीन भर म्हणून, ह्युंदाई बेयॉन इंटेलिजंट मोबिलिटीच्या नवीन दृष्टिकोनाला सादर करते, जिथे नाविन्यता, अभिव्यक्ती आणि भावना स्पष्ट हेतूने एकत्र येतात. बदलत्या भारतासाठी डिझाइन केलेल्या या नवीन एसयूव्हीमधून ह्युंदाईची जागतिक डिझाइन आणि उत्पादन तत्त्वज्ञान दिसून येते, तसेच नव्या पिढीतील ग्राहकांसाठी इंटेलिजंट अनुभव घेऊन येते. आगामी एसयूव्हीच्या नावाच्या अनावरणाबाबत मत व्यक्त करत एचएमआयएलचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ तरुण गर्ग म्हणाले, "ह्युंदाई बेयॉनच्या माध्यमातून आम्ही केवळ नवीन एसयूव्हीपेक्षा अधिक काही सादर करत आहोत. बेयॉन नव्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करते, जी आमच्या ग्राहकांसाठी इंटेलिजंट, सर्वोत्तम आणि अर्थपूर्ण अनुभव निर्माण करण्याची आमची महत्त्वाकांक्षा दर्शवते.


## पंचायत समिती जुन्नर, जिल्हा परिषद पुणे

ग्रामपंचायत उंब्रज नं. १

जाहीर निविदा सूचना क्र.१ सन २०२६ - २७ (प्रथम वेळ)

ग्रामपंचायत उंब्रज नं.१ ता. जुन्नर, जि. पुणे यांचे तर्फे ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन/जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पंजीकरण/नोंदणीकरण केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून दोन लिफाफा खालील कामांच्या सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | ठिकाण | निविदा रक्कम १८% जी.एस.टी. व इतर करासह | निविदा प्रसिद्ध दिनांक व वेळ | निविदा स्विकारनेचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडण्याचा वेळ व दिनांक | निविदा फॉर्म फी विनापरतीची | इसार/बयाना रक्कम १% | कामाची मुदत | कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग २०२५/२६ अबंधित | दोहीवाट अंगणवाडी तार कुंपण करणे | उंब्रज नं.१ | ५०००० | १७/०९/२०२६ स.११.००वा | २४/०९/२०२६ सायं. ०५.०० वा.पर्यंत | पुढील मासिक सभा | ५०० | ५०० | ६ महिने | जि.प.पुणे खुला नोंदणीकृत १ ते ७ |
| २ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग २०२५/२६ बंधित | गावठाण बंदिस्त गटार करणे | उंब्रज नं.१ | ४९९७१२ | | | | ५०० | ४९९७ | ६ महिने | |
| ३ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग अबंधित | गावठाण अंतर्गत बंदिस्त गटार करणे | उंब्रज नं.१ | १९४४८५ | | | | ५०० | १९४५ | ६ महिने | |
| ४ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग अबंधित | अंगणवाडी सोंडेवाडी बंदिस्त गटार करणे | उंब्रज नं.१ | ७५८७९ | | | | ५०० | ७५९ | ६ महिने | |
| ५ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग २०२५/२६ बंधित | अंगणवाडी शौचालय दुरुस्ती | उंब्रज नं.१ | १००००० | | | | ५०० | १००० | ६ महिने | |
| ६ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग २०२५/२६ अबंधित | रस्ते दुरुस्ती | उंब्रज नं.१ | २००००० | | | | ५०० | २००० | ६ महिने | |
| ७ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग २०२५/२६ बंधित | अंगणवाडी दुरुस्ती | उंब्रज नं.१ | ८४६५३ | | | | ५०० | ८४६ | ६ महिने | |
| ८ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग २०२५/२६ अबंधित | समाजमंदिर सुधारणा | उंब्रज नं.१ | ४९९९९ | | | | ५०० | ५०० | ६ महिने | |
| ९ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग बंधित | ग्रामपंचायत सार्वजनिक शौचालय दुरुस्त करणे | उंब्रज नं.१ | २५८५०५ | | | | ५०० | २५८५ | ६ महिने | |
| १० | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग बंधित | ग्रामपंचायत कार्यालय सोलर सिस्टीम बसविणे | उंब्रज नं.१ | २९७२६६ | | | | ५०० | २९७३ | ६ महिने | |
| ११ | ग्रा.प. १५ वा वित्त आयोग बंधित | अंगणवाडी पाणीपुरवठा करणे | उंब्रज नं.१ | ५०००० | | | | ५०० | ५०० | ६ महिने | |

**टीप - कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवलेला आहे.**

